मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# सहामाहीत 610 कोटींची विक्रमी वसुली!

## ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी भरला कर; वाकड आघाडीवर

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर वसुलीला यंदा मोठी चालना मिळाली असून, २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच सहामाहीत तब्बल ६१० कोटी ४४ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्या सहामाहीतील ही विक्रमी वसुली ठरली आहे. विशेष म्हणजे, शहरातील ७ लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्तांपैकी ५ लाख ९ हजार २०० मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे.**

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून यंदा कर वसुलीसाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आले. कर सवलतींची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाद्वारे जनजागृती, थकबाकीदारांना नोटिसा देणे, जप्तीची कारवाई करणे तसेच थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करणे अशा विविध उपाययोजनांमुळे कर वसुलीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गतवर्षी सप्टेंबरअखेर ४ लाख ७८ हजार २६८ मालमत्ताधारकांनी ६०३ कोटी ८२ लाख रुपयांचा कर भरला होता. यंदा मात्र सहामाहीतच ६१० कोटी ४४ लाख रुपयांची वसुली झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत ६ कोटी ६२ लाख रुपयांची अधिक वसुली झाली आहे, अशी माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.




> “मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा महत्त्वाचा स्रोत आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्या सहामाहीत प्रथमच ६१० कोटींचा कराचा भरणा झाला आहे. कर भरून शहर विकासात योगदान देणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार. यापुढील काळात थकबाकीदार मालमत्तांकडून कर वसुलीला प्राधान्य देण्यात येणार आहे.”
>
> -डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन कर भरण्याच्या सुविधेलाही नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. घरबसल्या कर भरण्याची सुविधा उपलब्ध असल्याने ४ लाख ४५ हजार मालमत्ताधारकांनी ऑनलाइन पद्धतीने तब्बल ४७१ कोटी ८३ लाख रुपयांचा कर भरला आहे. दरम्यान, महापालिकेच्या १८ करसंकलन विभागीय कार्यालयांमध्ये वाकड करसंकलन कार्यालयाने सर्वाधिक ८४ कोटी ९१ लाख रुपयांची वसुली केली आहे. त्यानंतर थेरगाव कार्यालयाने ५३ कोटी १५ लाख, कस्पटे वस्तीने ४५ कोटी १९ लाख, किवळेने ४४ कोटी ९१ लाख, पिंपरी नगरने ४४ कोटी ९९ लाख आणि चिखली कार्यालयाने ४४ कोटी ६१ लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. तर तळवडे करसंकलन कार्यालयाची वसुली ११ कोटी ९९ लाख रुपये राहिली आहे.

मागील चार वर्षांतील सहामाही वसुलीचा विचार करता २०२३-२४ मध्ये ५९० कोटी ६० लाख, २०२४-२५ मध्ये ५१२ कोटी ६२ लाख, २०२५-२६ मध्ये ६०३ कोटी ८२ लाख, तर २०२६-२७ मध्ये ६१० कोटी ४४ लाख रुपयांची वसुली झाली आहे. त्यामुळे यंदाच्या पहिल्या सहामाहीत मालमत्ता कर वसुलीने मागील वर्षाचा आकडा ओलांडला आहे.

### निवासी मालमत्ताधारक आघाडीवर

कर भरणाऱ्यांमध्ये निवासी मालमत्ताधारकांची संख्या सर्वाधिक आहे. यामध्ये ४ लाख ५१ हजार ७३९ निवासी, ४० हजार १९७ बिगरनिवासी, १० हजार ४४ मिश्र, ३ हजार ६६७ औद्योगिक आणि ३ हजार ४८९ मोकळ्या जमिनींच्या मालमत्तांचा समावेश आहे.महापालिकेच्या विविध करसवलतींचा लाभ घेत नागरिकांनी वेळेत कर भरण्यास दिलेला प्रतिसाद आणि ऑनलाइन सुविधेचा वाढता वापर यामुळे यंदाच्या पहिल्या सहामाहीत मालमत्ता कर वसुलीने विक्रमी टप्पा गाठला आहे.

# गौरीच्या दागिन्यांवर मोलकरणीचा डल्ला; २.८४ लाखांचा ऐवज हस्तगत!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गौरी-गणपती उत्सवादरम्यान घरात स्थापित केलेल्या एकविरा देवीच्या मूर्तीवरील सोन्याचे मंगळसूत्र व पेंडल चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणाचा तपास करत शिरगाव परंदवडी पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने चोरी करणाऱ्या मोलकरणीला अटक केली असून, तिच्याकडून २ लाख ८४ हजार ८४७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी फिर्यादी यांनी शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गौरी-गणपती उत्सवानिमित्त त्यांच्या घरात एकविरा देवीची मूर्ती स्थापित करण्यात आली होती. या मूर्तीला घातलेले ३०.५४६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व पेंडल अचानक चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून शिरगाव परंदवडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोरीचा तपास सुरू केला.

तपास सुरू असताना पोलिसांनी उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपी महिलेचा शोध घेत तिला अटक केली. चौकशीत चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तिच्याकडून ३०.५४६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व पेंडल असा एकूण २ लाख ८४ हजार ८४७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. आरोपी महिलेला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिला ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पारखे, किशोर गिरीगोसावी, सचिन काचोळे तसेच पोलीस कर्मचारी प्रसाद जंगीलवाड, दिलीप राठोड आणि सागर कोळी यांच्या पथकाने केली.

# मोईसह पीएमआरडीए हद्दीत अग्निशमन केंद्रे उभारा!

## चाकणच्या आगीनंतर आमदार महेश लांडगे यांची पीएमआरडीएकडे मागणी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (PMRDA) हद्दीत नागरी वसाहतींसोबतच उद्योग, गोदामे आणि व्यावसायिक आस्थापनांचा झपाट्याने विस्तार होत आहे. मात्र, वाढत्या विस्ताराच्या तुलनेत अग्निशमन यंत्रणा पुरेशी आहे का, याचा विभागनिहाय आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे मोईसह गरज असलेल्या भागांत नवीन अग्निशमन केंद्रे किंवा उपकेंद्रे उभारावीत, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**






चाकण एमआयडीसीतील चिंबळी फाटा परिसरातील आर. आर. पॅकेजिंग कंपनीला ९ सप्टेंबर रोजी लागलेल्या भीषण आगीच्या पार्श्वभूमीवर लांडगे यांनी ही मागणी केली आहे. या आगीचा परिणाम शेजारील कंपन्यांवरही झाला होता. आग आटोक्यात आणण्यासाठी पीएमआरडीएसह पिंपरी-चिंचवड महापालिका, आळंदी नगर परिषद आणि एमआयडीसीच्या अग्निशमन दलांना संयुक्तपणे काम करावे लागले होते. त्यामुळे औद्योगिक भागात आगीसारखी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने मदत पोहोचण्यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम अग्निशमन व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे.

अग्निशमन दलाच्या जवानांनी केलेल्या कामाचे कौतुक करताना वाढत्या औद्योगिक विस्तारानुसार अग्निशमन केंद्रांची संख्या, आवश्यक साधनसामग्री आणि विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः पीएमआरडीएच्या हद्दीत उद्योग आणि गोदामांची संख्या वाढत असताना आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा वेळ हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

> "अग्निशमन जवान तत्परतेने काम करत आहेत. मात्र, वाढत्या वसाहती आणि उद्योगांपर्यंत मदत वेळेत पोहोचण्यासाठी जवळची केंद्रे, पुरेशी साधनसामग्री आणि सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. मोईसह जोखीम असलेल्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करून नवीन अग्निशमन केंद्रांचा कालबद्ध आराखडा निश्चित करावा. यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहोत."
>
> -महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

दरम्यान, कुदळवाडीतील अतिक्रमणविरोधी कारवाईनंतर काही भंगार व्यावसायिक मोई आणि परिसरात स्थलांतरित झाल्याचे निदर्शनास येत असल्याचा उल्लेखही लांडगे यांनी केला आहे. त्यामुळे भंगार साठवणूक केंद्रे, पत्राशेड आणि त्यांच्या लगतच्या वस्तीची प्रत्यक्ष पाहणी करून आगीचा संभाव्य धोका तपासावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. चाकण एमआयडीसीच्या हद्दीबाहेरील लहान उद्योग, कार्यशाळा आणि गोदामांसाठीही स्वतंत्र अग्निसुरक्षा नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

विद्यमान अग्निशमन केंद्रांमधून विविध भागांत घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष वेळ, रस्त्यांवरील अडथळे, पाण्याची उपलब्धता आणि भागनिहाय आगीचा धोका यांचे सर्वेक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्वेक्षणाच्या आधारे नवीन अग्निशमन केंद्रांसाठी आवश्यक जागा निश्चित करावी. तसेच त्यासाठी निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ, अग्निशमन वाहने आणि आधुनिक बचाव उपकरणांची उपलब्धता याबाबतही नियोजन करावे, असे लांडगे यांनी सुचवले आहे.

याशिवाय पीएमआरडीए, एमआयडीसी, स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस आणि आरोग्य विभागाची संयुक्त बैठक घेऊन आपत्कालीन प्रतिसाद आराखडा तयार करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांमध्ये समन्वय राहावा यासाठी नियमित मॉक ड्रिल आणि सरावाचे नियोजन करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

प्रस्तावित अग्निशमन केंद्रांसाठी करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष आणि केंद्र उभारणीचा कालबद्ध आराखडा लेखी स्वरूपात कळवावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएकडे केली आहे.

# दिवेआगारच्या समुद्रात आळंदीतील ८ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध दिवेआगर समुद्रकिनारी गुरुवारी (१ ऑक्टोबर) अत्यंत दुर्दैवी दुर्घटना घडली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील विनर्स अकॅडमीच्या सहलीसाठी आलेल्या आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. या घटनेने आळंदी परिसरासह पुणे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून, मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**



आळंदी येथील विनर्स अकॅडमीमधून इयत्ता अकरावी आणि बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीसाठी विद्यार्थी रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध दिवेआगर समुद्रकिनारी आले होते. या सहलीमध्ये एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये २५ मुले आणि १७ मुलींचा समावेश होता. समुद्रकिनारी पोहोचल्यानंतर काही विद्यार्थी समुद्राच्या पाण्यात उतरले. मात्र, समुद्रातील पाण्याची खोली, लाटांचा वेग आणि परिस्थितीचा अंदाज न आल्याने काही विद्यार्थी खोल पाण्यात ओढले गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही क्षणांतच हा प्रकार घडल्याने सहलीच्या ठिकाणी मोठी खळबळ उडाली.

विद्यार्थी समुद्रात बुडत असल्याचे लक्षात येताच उपस्थित शिक्षक, सहकारी विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस तसेच बचाव पथकांनीही घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिक आणि वॉटर स्पोर्ट्स कर्मचाऱ्यांच्या मदतीने समुद्रात बचावकार्य सुरू करण्यात आले. पाण्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले. मात्र, या दुर्घटनेत आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. बचाव पथकाने सर्व आठ विद्यार्थ्यांचे मृतदेह समुद्रातून बाहेर काढले असून, त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये राजवीर वाहिले, सोहम भांडवळकर, कौस्तुभ दोंड, यश वानखेडे, कैवल्य वासंकर, तन्मय वाहिले, सुमित अहिरे आणि प्रणव बनसोडे यांचा समावेश आहे. अवघ्या किशोरवयात असलेल्या या विद्यार्थ्यांचा अशाप्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना दुर्घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ उडाली.

दिवेआगर हे रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून, सलग सुट्ट्या किंवा सणांच्या काळात येथे पुणे, मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने पर्यटक येतात. समुद्रकिनाऱ्याचे आकर्षण असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने समुद्रात उतरतात. मात्र, समुद्रातील भरती-ओहोटी, अचानक वाढणाऱ्या लाटा, पाण्याची खोली आणि प्रवाह यांचा अंदाज न आल्यास काही क्षणांत परिस्थिती गंभीर होऊ शकते. या दुर्घटनेनंतर दिवेआगरसह प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षाव्यवस्थेचा आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### मृत विद्यार्थ्यांची नावे!

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या आठ विद्यार्थ्यांची नावे समोर आली आहेत. त्यामध्ये **राजवीर वाहिले, सोहम भांडवळकर, कौस्तुभ दोंड, यश वानखेडे, कैवल्य वासंकर, तन्मय वाहिले, सुमित अहिरे आणि प्रणव बनसोडे** यांचा समावेश आहे.

# 99% हिस्सा, तरी आरोपी नाही; पार्थ पवारांवर कोर्टाचा सवाल!

## १% हिस्सेदार आरोपी कसा? मुंढवा जमीन व्यवहारात उच्च न्यायालयाची पुन्हा विचारणा

**»» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील मुंढवा येथील ४० एकर सरकारी जमीन कथितरीत्या बाजारमूल्यापेक्षा कमी दरात खरेदी केल्याच्या प्रकरणावरून मुंबई उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा पोलिसांच्या तपासावर प्रश्न उपस्थित केला आहे. 'अलमेडा एंटरप्रायझेस एलएलपी'मध्ये ९९ टक्के हिस्सा असलेले राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राज्यसभा खासदार पार्थ पवार यांना अद्याप आरोपी का करण्यात आलेले नाही, अशी विचारणा न्यायालयाने केली.**



न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठासमोर पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली. यावेळी भागीदारी फर्ममध्ये ९९ टक्के हिस्सा असलेली व्यक्ती आरोपी नसताना केवळ १ टक्का हिस्सा असलेल्या व्यक्तीला आरोपी करण्यात आल्याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. पार्थ पवार हे प्रभावशाली व्यक्ती असून विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

या प्रकरणाच्या पुढील तपासाबाबत राज्याच्या पोलीस महासंचालकांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. पुणे पोलिसांना या प्रकरणाचा सविस्तर आणि व्यावसायिक पद्धतीने तपास करण्याचे आदेश देण्यात आले असून, तपासाच्या प्रगतीवर आपण स्वतः लक्ष ठेवणार असल्याचे महासंचालकांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने या म्हणण्याची दखल घेतली.

दरम्यान, तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यावर सरकारी जमिनीच्या व्यवहारात पदाचा गैरवापर करून व्यवहारास मदत केल्याचा आरोप आहे. मात्र, येवले यांनी हे आरोप फेटाळून लावत आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आल्याचा दावा केला. तहसीलदार म्हणून त्यांनी अर्धन्यायिक अधिकारांचा वापर करून आदेश दिले होते; मात्र, भाडेकरू कायद्यांतर्गत कोणाच्या बाजूने बेकायदा मोबदला स्वीकारून आदेश दिल्याचा त्यांच्याविरोधात कोणताही विशिष्ट आरोप नसल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

या निरीक्षणाच्या आधारे न्यायालयाने सूर्यकांत येवले यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. मात्र, त्याच सुनावणीदरम्यान पार्थ पवार यांना आरोपी का करण्यात आलेले नाही, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

यापूर्वी ७ सप्टेंबर रोजीही मुंबई उच्च न्यायालयाने पार्थ पवार यांचे नाव आरोपी म्हणून का समाविष्ट करण्यात आलेले नाही, याचे स्पष्टीकरण देण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांना वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे मुंढवा जमीन व्यवहारातील तपास आणि त्यामध्ये पार्थ पवार यांच्या भूमिकेबाबत न्यायालयाची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# पुणेकरांचा 'स्मार्ट एसी'कडे कल; एआयमुळे वीजबिलात बचत!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्याचे हवामान तुलनेने सौम्य असले तरी वाढत्या उष्णतेमुळे घरगुती वातानुकूलन यंत्रांची मागणी वाढत आहे. घर वेगाने थंड करण्यासोबतच विजेचा अनावश्यक वापर कमी करण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), जलद शीतकरण आणि उच्च ऊर्जा कार्यक्षमतेचा मेळ असलेल्या 'स्मार्ट एसी'ला बाजारात मागणी निर्माण होत असल्याचे समोर आले आहे.**



वातानुकूलन यंत्र निर्मिती क्षेत्रातील ऑप्टिमिस्ट कंपनीने पुणे बाजारपेठेत विस्ताराचे पाऊल उचलले आहे. वाढत्या तापमानामुळे एसीची मागणी वाढत असताना, ग्राहकांचा कल आता केवळ थंडावा देणाऱ्या एसीपेक्षा ऊर्जा बचत आणि स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या उपकरणांकडे वाढत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. कंपनीने जूनमध्ये बंगळुरू, दिल्ली आणि हैदराबाद या प्रमुख शहरांमध्ये प्रवेश करत आपली पहिली एअर कंडिशनर श्रेणी सादर केली होती. त्यानंतर कोलकता, चेन्नई, मुंबई आणि अहमदाबादसह देशातील इतर प्रमुख बाजारपेठांमध्येही कंपनीने विस्तार सुरू केला आहे.

कंपनीचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष गोयल यांनी सांगितले की, बदलत्या हवामानामुळे घरातील तापमान वेगाने कमी करण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र, त्याचवेळी एसीच्या वाढत्या वापरामुळे वीजबिलात होणारी वाढ कमी करण्याकडेही ग्राहकांचे लक्ष आहे. त्यामुळे जलद शीतकरणासोबतच विजेचा कार्यक्षम वापर करणाऱ्या तंत्रज्ञानाला ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. ही गरज लक्षात घेऊन कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित उच्च-कार्यक्षमता स्मार्ट एसीची नवीन श्रेणी बाजारात आणली आहे.

या स्मार्ट एसीमध्ये एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शीतकरण अधिक कार्यक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. बदलत्या परिस्थितीनुसार शीतकरणाची गरज लक्षात घेऊन एसीचा वापर अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न या तंत्रज्ञानातून केला जात असल्याचे कंपनीने सांगितले. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त वीज वापर टाळण्यास मदत होऊन ग्राहकांना ऊर्जा बचतीचा फायदा मिळू शकतो, असा कंपनीचा दावा आहे.

कंपनीच्या नवीन एसी श्रेणीमध्ये उच्च-कार्यक्षमता मायक्रोचॅनेल उष्णता-विनिमयक, अनुकूलित उष्णता संरचना आणि ट्विन-रोटरी इन्व्हर्टर कॉम्प्रेसर यांसारख्या आधुनिक तांत्रिक वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे एसीची शीतकरण क्षमता आणि ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः भारतातील उष्ण हवामान लक्षात घेऊन या उपकरणांची रचना करण्यात आल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.

या एसीमध्ये 'टर्बो प्लस' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या तंत्रज्ञानामुळे १.४ टन क्षमतेच्या एसीला १.९ टनांपर्यंतची क्षमता मिळू शकते. त्यामुळे खोली अधिक वेगाने थंड करण्यास मदत होते. वाढत्या तापमानाच्या काळात कमी वेळेत प्रभावी शीतकरण मिळावे, या उद्देशाने हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आल्याचे कंपनीने नमूद केले आहे.

ऑप्टिमिस्टच्या या एसी श्रेणीला ६.०५ आयएसईईआर मानांकन असल्याचे कंपनीने सांगितले आहे. भारतातील विविध भागांमध्ये उन्हाळ्यात जाणवणारे उच्च तापमान आणि आव्हानात्मक हवामान लक्षात घेऊन ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, ५० अंश सेल्सिअसपर्यंतच्या तापमानातही १.४ टन क्षमतेचा एसी सातत्यपूर्ण शीतकरण देऊ शकतो, असा कंपनीचा दावा आहे. त्यामुळे अत्यंत उष्ण वातावरणातही एसीच्या कामगिरीत सातत्य राखण्यावर भर देण्यात आला आहे.

स्मार्ट एसीमध्ये केवळ थंडावा देण्याऐवजी ऊर्जा कार्यक्षमतेवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. एसीचा वापर वाढल्याने घरगुती वीजबिलात होणारी वाढ ही ग्राहकांसाठी महत्त्वाची चिंता बनली आहे. या पार्श्वभूमीवर एआय आणि इन्व्हर्टर तंत्रज्ञानाच्या मदतीने विजेचा वापर अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे.कंपनीच्या दाव्यानुसार, स्मार्ट एसीच्या वापरामुळे वीज देयकात २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते. मात्र, प्रत्यक्ष बचत ही एसीचा वापर, खोलीचा आकार, तापमान, वापरण्याची पद्धत आणि इतर परिस्थितींवर अवलंबून राहू शकते.

# आचारसंहितेत नगरसेवक निधीची घाई; दीड कोटींच्या 17 निविदा!

## ‘स’ यादीतील कामांना मंजुरीची लगबग; प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर महापालिकेतील अनेक कामांना ब्रेक लागला आहे. नव्याने निविदा काढण्यावर निर्बंध असताना पुणे महापालिकेच्या ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाने मात्र नगरसेवकांच्या ‘स’ यादीतील कामे अत्यावश्यक असल्याचे दाखवत तब्बल १ कोटी ४० लाख ९५ हजार ८९१ रुपयांच्या १७ निविदा काढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आचारसंहिता लागू असतानाच या निविदा काढण्याची घाई नेमकी कशासाठी, असा सवाल उपस्थित झाला आहे.**




प्रभाग क्रमांक १३ डमधील पुणे स्टेशन आणि जय जवाननगर परिसरातील विविध कामांसाठी या निविदा काढण्यात आल्या आहेत. यामध्ये चेंबर उचलणे व दुरुस्ती करणे, पादचारी मार्गांची दुरुस्ती, सांडपाणी वाहिनी दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती तसेच मोठ्या व्यासाची सांडपाणी वाहिनी टाकण्यासारख्या कामांचा समावेश आहे. त्याचबरोबर पावसाळी चेंबर आणि पाइपची स्पायडर मशीन, जेटिंग मशीन आणि ग्रॅब मशीनच्या माध्यमातून साफसफाई करण्याची कामेही प्रस्तावित करण्यात आली आहेत.

निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर महापालिकेच्या नवीन कामांबाबत निर्णय घेणे आणि त्याची प्रक्रिया पुढे नेण्यावर बंधने आली आहेत. त्यामुळे शहरातील अनेक विभागांची कामे लांबणीवर पडली आहेत. नगरसेवकांच्या ‘स’ यादीतून केली जाणारी कामेही आचारसंहितेच्या कक्षेत आली आहेत. अशा परिस्थितीत ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाने आचारसंहिता लागू झाल्यानंतरच प्रभाग क्रमांक १३ डमधील ‘स’ यादीतील कामांसाठी निविदा काढल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या १७ कामांसाठी संबंधित कंत्राटदाराकडे स्वतःची यंत्रसामग्री असणे तसेच दहा वर्षांचा अनुभव असणे आवश्यक असल्याची अट निविदेत ठेवण्यात आली आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेत घालण्यात आलेल्या अटी आणि आचारसंहिता लागू झाल्यानंतरही काढण्यात आलेल्या निविदांबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

महापालिकेच्या परिमंडळ क्रमांक १ च्या उपायुक्त आशा राऊत यांनी या कामांबाबत स्पष्टीकरण देताना प्रभाग क्रमांक १३ डमध्ये पथ आणि मलनिःसारण विभागाशी संबंधित देखभाल-दुरुस्तीची अत्यावश्यक कामे असल्याचे सांगितले. निवडणूक शाखेकडे विचारणा केल्यानंतरच या कामांच्या निविदा काढण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, महापालिकेचे निवडणूक शाखेचे उपायुक्त प्रसाद काटकर यांनी या प्रकरणातील वेगळी बाजू स्पष्ट केली. आचारसंहितेच्या काळात देखभाल-दुरुस्तीची तसेच अत्यावश्यक कामे करता येतात, असे त्यांनी सांगितले. मात्र, संबंधित कामे नगरसेवकांच्या ‘स’ यादीतील असल्याने ती आचारसंहिता संपल्यानंतर करणे अधिक योग्य ठरले असते, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, ही कामे महापालिकेच्या मुख्य खात्याच्या निधीतूनही करता आली असती, असे त्यांनी नमूद केले.

त्यामुळे एका बाजूला ही कामे अत्यावश्यक असल्याचे सांगून निविदा काढण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट केले जात असताना, दुसरीकडे निवडणूक शाखेकडून ‘स’ यादीतील कामे आचारसंहितेनंतर करणे योग्य ठरले असते, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या काळात नगरसेवकांच्या निधीतूनच या १७ कामांच्या निविदा काढण्याची घाई का करण्यात आली, यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# विद्यापीठ क्रमवारीत भारताची झेप; तीन विद्यापीठे टॉप-५००मध्ये!

**» पुणे | प्रतिनिधी**

**जागतिक स्तरावर प्रतिष्ठेची मानली जाणारी ‘टाइम्स हायर एज्युकेशन’ (THE) वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२७ जाहीर झाली आहे. या क्रमवारीत भारतातील तीन विद्यापीठांनी जगातील पहिल्या ५०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवले आहे. यंदाच्या क्रमवारीत भारतातील एकूण १५४ विद्यापीठांचा समावेश झाला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या १५ ने वाढली आहे.**



यंदा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISC) ने जागतिक पातळीवर २५४वे स्थान मिळवत भारतीय विद्यापीठांमध्ये आघाडी घेतली आहे. त्यानंतर सविता इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल अँड टेक्निकल सायन्सेसने ३२५ ते ३५० या गटात, तर शूलिनी युनिव्हर्सिटी ऑफ बायोटेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट सायन्सेसने ४५१ ते ५०० या गटात स्थान मिळवले आहे. त्यामुळे भारतातील तीन विद्यापीठांचा जगातील पहिल्या ५०० विद्यापीठांमध्ये समावेश झाला आहे.

याशिवाय जामिया मिलिया इस्लामिया आणि केआयआयटी युनिव्हर्सिटी यांनी ५०१ ते ५५० या गटात स्थान मिळवले आहे. देशातील काही आयआयटी, एनआयटी तसेच नामांकित खासगी विद्यापीठांना मात्र पहिल्या ५०० विद्यापीठांच्या यादीत स्थान मिळालेले नाही. त्यामुळे जागतिक क्रमवारीत भारतीय उच्च शिक्षण संस्थांच्या कामगिरीत यंदाही विविधता दिसून येत आहे.

या जागतिक क्रमवारीत महाराष्ट्रातील काही विद्यापीठांनीही स्थान मिळवले आहे. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने ६०१ ते ६५० या गटात स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर पुणे) आणि अडाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रीसर्च यांना १००१ ते १२०० या गटात स्थान मिळाले आहे. कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ आणि एमआयटी एडीटी विद्यापीठ यांनी १४०१ ते १६०० या गटात स्थान मिळवले आहे. २०२६च्या तुलनेत यंदाच्या क्रमवारीत काही विद्यापीठांचे स्थान उंचावले असून, काही विद्यापीठांच्या क्रमवारीत घसरण झाल्याचेही दिसून येते.

‘टाइम्स हायर एज्युकेशन’च्या २०२७च्या जागतिक क्रमवारीत ११८ देशांतील २,२९७ विद्यापीठांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यापीठांचे मूल्यमापन करताना अध्यापन, संशोधनाचे वातावरण, संशोधनाची गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन आणि उद्योगाशी असलेले संबंध अशा विविध निकषांचा विचार केला जातो. या निकषांच्या आधारे विद्यापीठांची जागतिक क्रमवारी निश्चित करण्यात आली आहे.

जागतिक क्रमवारीत ऑक्सफर्ड विद्यापीठाने सलग ११व्या वर्षी पहिले स्थान कायम ठेवले आहे. त्यानंतर मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) दुसऱ्या स्थानी आहे. प्रिन्स्टन विद्यापीठ आणि स्टॅनफर्ड विद्यापीठ यांनी संयुक्तपणे तिसरे स्थान मिळवले आहे.

यंदा भारतातून १५४ विद्यापीठांचा समावेश झाल्याने जागतिक क्रमवारीत सहभागी भारतीय संस्थांची संख्या वाढली आहे. मात्र, पहिल्या ५००मध्ये केवळ तीन विद्यापीठांना स्थान मिळाले आहे. त्यामुळे जागतिक पातळीवरील संशोधन, अध्यापनाची गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या क्षेत्रात भारतीय विद्यापीठांची कामगिरी या क्रमवारीच्या निमित्ताने पुन्हा चर्चेत आली आहे.